**परिपत्रक :** **म्हाडातील मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळांतर्गत तांत्रिक मान्यता प्रस्तावामध्ये अंतर्भूत घटकांच्या अनुषंगाने मार्गदर्शन सूचना निर्गमित करणेबाबत.**

# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१**

---

**जा.क्र.एमएच/मुअ-१/काअ-१/प्रा./ /२०२५. दिनांक:**

**संदर्भ :** १) मुख्य अभियंता-१/ प्रा यांचे परिपत्रक क्र. जा.क्र.एमएच/मुअ-१/काअ-१/प्रा./ ET-६२४ , दि.०३/१०/२०२२.

२) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक बीजीएम/२०२३/प्र.क्र.८७/ अर्थ-१ , दि. १६/०२/२०२४.

३) मुख्य अभियंता-१/ प्रा यांचे परिपत्रक क्र. जा.क्र.एमएच/मुअ-१/काअ-१/प्रा./ ET-१७५, दि.०४/०३/२०४

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळांकडून विविध कामांसाठी तांत्रिक मान्यता देण्याचे प्रस्ताव तयार करण्यात येतात. तांत्रिक मान्यता किंमतमध्ये दर्शविण्यात येत असलेल्या घटकांमध्ये एकसूत्रता आणण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी /प्रा. यांच्या मान्यतेचे मा. मुख्य अभियंता-१प्रा. यांचे परिपत्रक क्र. जा.क्र.एमएच मुअ-१/काअ-१/प्रा./ET-६२४ दि. ०३/१०/२०२२ मधील तांत्रिक मंजूरीमधील अधिकार प्रदानतेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे संदर्भ क्र. ०२ व

संदर्भ क्र. ०३ वरील शासन निर्णयानुसार विविध प्रकल्पांच्या तांत्रिक मान्यता आदेशामध्ये केवळ खालील नमूद घटकांवरील खर्चाचा तपशील नमूद करावा :-

१. प्रकल्पाचे मूळ कामाची किंमत (Work Portion)

२. स्वामित्व धन (Royalty)

३. साहित्य चाचणी रक्कम (Q.C. Testing Charges)

४. अनुज्ञेय वस्तू व सेवाकर (G.S.T.)

५. कामगार विमा (Labour Insurance) १% (रू. २५.०० लक्ष पर्यंत ०.५%, रू. २५.०० लक्ष पेक्षा जास्त १%)

तांत्रिक मान्यता प्रस्तावामध्ये नमूद घटकांचा तपशील खालील प्रमाणे परिगणित करण्यात यावे .

| | |
|---|---|
| **प्रकल्पाचे मूळ कामाची किंमत (Work Portion)+ स्वामित्व धन + साहित्य चाचणी रक्कम**<br>**(Cost of Work Portion+ Royalty + Testing Charges )** | **(A)** |
| **अनुज्ञेय वस्तू व सेवाकर** **(Add:18%GST) on** (A) | (B) |
| **कामगार विमा ((Labour Insurance) १% (रू. २५.०० लक्ष पर्यंत ०.५%, रू. २५.०० लक्ष पेक्षा जास्त १%) ) on (A)** | **(C)** |
| **Add:2.5% WC Establishment on** (A) | **(D)** |
| **Total Amount (A+B+C+D)** | (E) |

उपरोक्त निर्णयातील तरतुदी म्हाडातील मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळांतर्गत सर्व कामांकरिता वरीलप्रमाणे हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून जशाच्या तश्या लागू करण्यात येत आहेत.

सदर परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येईल

Signed by
Dhirajkumar Shankar Pandirkar
Date: 15-12-2025 17:40:44

**मुख्य अभियंता - १**
**प्राधिकरण**

**प्रति:-**

- मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण
- मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्राधिकरण.
- मुख्य अभियंता-२,३/प्राधिकरण.
- वित्त नियंत्रण/प्राधिकरण.
- सचिव/प्राधिकरण.
- मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
- मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्राधिकरण.

**माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :**

- उपमुख्य अभियंता - मुं.झो.सु. मंडळ, यांना आपल्या अधिनस्त अधिकारी/ कर्मचारी यांना परिपत्रकाची प्रत अग्रेषित करण्यासाठी
- मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्राधिकरण.
- कार्यकारी अभियंता- शहर / पूर्व / पश्चिम / मुं.झो.सु. मंडळ
- निवासी लेखाधिकारी / म्हाडा.
- मुख्य लेखाधिकारी - मुं.झो.सु. मंडळ